# विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची अंतिम सत्राचीच परीक्षा

पान १ वरुन

या गुणांबाबत काही शंका असल्यास तसेच त्यामध्ये मूल्यवर्धन करण्याची विद्यार्थ्यांची इच्छा असल्यास त्याला ऐच्छिक परीक्षा देता येणार आहे. अशा प्रकारच्या परीक्षांबाबत विद्यापीठ स्तरावर निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच दुर्दैवाने जर एखादा विद्यार्थी या परीक्षांमध्ये नापास झाला, तर त्यालाही पुढील वर्षात प्रवेश दिला जाईल. पण, त्यांना नापास झालेल्या विषयांची परीक्षा द्यावी लागेल. या विषयींचे वेळापत्रकाचे निर्णयही विद्यापीठ स्तरावर घेण्यात येणार आहेत. एटीकेटीच्या विद्यार्थ्यांनाही हाच नियम लागू असणार आहे. हा निर्णय घेत असताना कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही तसेच शैक्षणिक वर्षाचेही नुकसान होणार नाही, याची पूर्ण दक्षता घेण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले. विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांचे शंकानिरसन करण्यासाठीचे सेल कार्यरत करावे, अशा सूचना देऊन सामंत यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थी व पालक यांच्या समुपदेशनासाठी जिल्ह्यात केंद्र स्थापन करावे. अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी १ ते ३० जुलै दरम्यान परीक्षा होणार आहेत, हे नजरेसमोर ठेवून अभ्यास सुरू करावा. तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार नाहीत, त्यांनीही सुट्टी आहे, अभ्यास नाही म्हणून घराबाहेर न पडता घरातच राहावे. उन्हाळी सुट्टीबाबत प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचा विचार करून प्रत्येक विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असेही सुचविले ..

## शैक्षणिक वर्ष १ सप्टेंबरपासून!

यूजीसीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शैक्षणिक वर्ष हे १ सप्टेंबरपासून सुरू करायचे आहे. त्या दृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण विभाग काम करीत आहे. समितीने या अहवालास सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंनी सहमती दर्शवली आहे. लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थी हे महाविद्यालयांमध्ये उपस्थित होते, असे गृहित धरूनच त्यांची उपस्थिती लिहिण्यात येणार आहे. या निर्णयामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता कोणत्याही प्रकारच्या संभ्रमास बळी पडू नये व आपल्या अभ्यासावर व शैक्षणिक सत्रांवर लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन केले.

तरुण भारत Sat, 09 May 2020
https://epaper.tarunbharat.com/c/51729141

# विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राचीच परीक्षा

## पदवी, पदव्युत्तर परीक्षा जुलैमध्ये : उच्च-तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती

प्रतिनिधी
सिंधुदुर्गनगरी

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात सध्या लॉकडाऊन सुरू आहे. त्या अनुषंगाने युजीसीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षांविषयी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नेमलेल्या समितीने अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सर्व पदवी व पदव्युत्तर कोर्सच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा १ ते ३० जुलै या दरम्यान घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून त्यांनी शुक्रवारी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी



ही माहिती दिली.

समितीने दिलेल्या अहवालाविषयी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्याशी चर्चा करून विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करूनच निर्णय घेतल्याचे सांगून सामंत पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील कोरोनाची परिस्थिती अशीच राहिली व लॉकडाऊन वाढला, तर पुन्हा एकदा २० जूनपर्यंत याविषयी फेरआढावा घेण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. समितीने केलेल्या शिफारशीनुसार ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार नाहीत, त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येणार आहे. हा प्रवेश देताना त्यांचे ग्रेड्स व मार्क्सही त्यांना दिले जातील. मार्क्स देण्याची पद्धत ही विद्यार्थ्यांना मिळणारी ५० टक्के ग्रेड ही अंतर्गत मूल्यमापनावर आधारित व ५० टक्के पूर्वीच्या सत्रातील परीक्षेचे गुण यावरून ठरणार आहे. पूर्वीच्या परीक्षा किंवा सत्रांचे गुण उपलब्ध नसल्यास वार्षिक सत्राच्या पहिल्या वर्षांच्या परीक्षांबाबत १०० टक्के अंतर्गत मूल्यमापन करण्यात येणार आहे.

पान ६ पहा

**पान ६ वर** **शिवाजी विद्यापीठातील १ लाख ४० हजार विद्यार्थ्यांना मिळणार पुढील वर्षात प्रवेश**

# University exam only for final-year students, others to be promoted

▶Continued from Page 1

Samant said that an expert committee had been set up with Mumbai University vice-chancellor Suhas Pednekar as coordinator and six other members, including officials from the higher education department and vice-chancellors (VCs) of other universities in Maharashtra, including Nitin Karmalkar, VC of Savitrbai Phule Pune University (SPPU), as one of its members.

**Karmalkar said that the SPPU was trying to set up a redressal cell to clear doubts of students in Pune, Nashik and Ahmednagar**

The committee submitted a report on May 6 which was discussed with chief minister Udhav Thackeray and deputy chief minister Ajit Pawar, among others, said Samant. He said the UGC guidelines issued last week mandated conduct of exams for final-year students.

Attendance of 45 days during the lockdown period will be considered as present for all students. The minister said the universities must consider students failing to meet the attendance guidelines for exams and gradation on humanitarian grounds.

Samant said, "The number of students appearing for exam in one classroom will be reduced in keeping with the social distancing norms. If it was not possible to conduct the practicals physically, then universities should consider journal assignments and online orals exams for marking."

Karmalkar said that the SPPU was trying to set up a redressal cell to clear doubts of students in Pune, Nashik and Ahmednagar. "All important decisions of the university will be conveyed to students through this cell. The university will draw up an action plan based on the state government's announcements and it will be announced soon."

..I MAHANAGARA PALIKE

पुढारी

# कौशल्य विकास कार्यशाळेत २७० जणांचा ऑनलाईन सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित एक दिवसीय कौशल्य व उद्योजकता ऑनलाईन कार्यशाळेला प्रतिसाद लाभला. प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी असे २७० हून अधिक कार्यशाळेत सहभागी झाले होते.

डॉ. ए. एम. गुरव यांनी 'कौशल्य व उद्योजकता विकास' या विषयावर मार्गदर्शन केले. कोरोना संकटाला संकट न मानता याचे संधीमध्ये रूपांतर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन



देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी 'चिकित्सक विचार व कौशल्य विकास' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, कौशल्य विकास करत असताना चिकित्सक विचाराच्या विविध टप्प्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

महेश चव्हाण यांनी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकासासाठी राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ. कृष्णा पाटील यांनी 'उद्योजकता विकास व कौशल्य अंतर विश्लेषण' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करून रोजगारक्षम विद्यार्थी घडविणे, ही काळाची गरज आहे. डॉ. ए. एम. गुरव व महेश चव्हाण यांनी ऑनलाईन कार्यशाळेचे समन्वयन केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

My Kolhapur Edition
9 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# विद्यापीठातील टेस्टिंग लॅबला गती

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठामध्ये साथीच्या आजारांचे निदान करण्यासाठी कायमस्वरुपी टेस्टींग लॅब उभारण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला होता. यास जिल्हा प्रशासनानेही मान्यता दिली आहे. या लॅब उभारणीच्या कामाला गती प्राप्त झाली असून लॅबमधील उपकरणे खरेदीसाठी विद्यापीठाच्यावतीने एका समितीची नेमणूक शुक्रवारी केली आहे. १ कोटी ४० लाख रुपये खर्च या लॅबसाठी प्रस्तावित केला आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कोराना तपासणी लॅब उभारण्याची तयारी शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने दर्शविली होती. याबाबतचा प्रस्तावही जिल्हा प्रशासनाकडे सादर केला होता. साथीच्या आजारांचे निदान करण्यासाठी विद्यापीठामध्ये कायमस्वरुपी टेस्टींग लॅब उभारण्याचा प्रस्ताव समोर आला. यास विद्यापीठाने तयारी दर्शविली. याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाने पुनश्च जिल्हा प्रशासनाकडे सादर केला. यास गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयाने मंजुरी दिली. १ कोटी ४० लाख रुपये खर्च अपेक्षीत आहे. या प्रयोगशाळेसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

# एक लाख ४० हजार विद्यार्थी थेट पुढील वर्षात

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि त्या अखत्यारित येणाऱ्या कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील ७५ हजार विद्यार्थी यंदा अंतिम वर्षांची परीक्षा देणार आहेत. तर एक लाख ४० हजार विद्यार्थ्यांना थेट पुढील वर्षात प्रवेश देण्यात येणार आहे. एकूण ६८० पैकी अंतिम वर्षांच्या २०० परीक्षाच यंदा घेण्यात येणार आहेत.

करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाउनमुळे लांबणीवर पडलेल्या परीक्षांचा पेच सोडवण्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी जाहीर केलेल्या निर्णयानुसार शिवाजी विद्यापीठ १ ते ३१ जुलै या कालावधीत परीक्षांचे वेळापत्रक तयार करणार आहे.

यंदा २७ मार्चपासून शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा सुरू होणार होत्या. मात्र २५ मार्चपासून लॉकडाउन लागू झाल्याने परीक्षा लांबणीवर टाकण्यात आल्या होत्या. दरम्यान वाढत्या लॉकडाउनमुळे मे महिन्याचा पहिला आठवडा संपत आला तरी विद्यापीठ व महाविद्यालयीन परीक्षांबाबत राज्याच्या शिक्षण मंत्रालयातर्फे निर्णय होत नसल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमावस्था होती. अखेर शुक्रवारी राज्य समितीने यूजीसीने आखून दिलेल्या निर्देशानुसार केवळ अंतिम वर्षांच्या परीक्षा घेऊन इतर वर्षांतील विद्यार्थ्यांना प्रमोट करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. यानुसार शिवाजी विद्यापीठ व संलग्न कॉलेजमधील अंतिम वर्षांच्या ७५ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा देणे बंधनकारक ठरणार आहे.

## विद्यापीठातील ७५ हजार विद्यार्थी देणार अंतिम परीक्षा



## अशा होणार परीक्षा

राज्य सरकारच्या सुचनेनुसार १ ते ३१ जुलै या कालावधीत १५ ते १८ दिवसांमध्ये परीक्षांचे वेळापत्रक तयार केले जाणार आहे. सध्या लॉकडाउनमुळे अनेक विद्यार्थी गावी आहेत. त्यांना वेळापत्रक पाठवले जाईल. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना हजर होण्याच्या सूचना दिल्या जातील. प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाइन घेण्याबाबत नियोजन केले जाईल. परीक्षा केंद्रात सुरक्षित वावर, सॅनिटायझर, मास्क या नियमांचे पालन करण्याची दक्षता घेतली जाईल.

“

राज्याच्या उच्च शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनानुसार परीक्षांचे नियोजन केले जाणार आहे. प्रमोट केल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा गेल्या व चालू शैक्षणिक वर्षातील परफॉर्मन्स पाहून गुणपत्रिका तयार केल्या जातील. एटीकेटीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा सप्टेंबरमध्ये घेण्याचे नियोजन केले जाईल.

– गजानन पळसे, प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ

## आकडेवारी दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| २९३ | शिवाजी विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालये |
| २ लाख २५ हजार | एकूण विद्यार्थी |
| ६८० | एकूण विद्याशाखा |
| २०० | यंदा अंतिम वर्षांच्या परीक्षा शाखा |
| ७५ हजार | अंतिम वर्षांची परीक्षा देणारे विद्यार्थी |
| १ लाख ४० हजार | पुढील वर्षांत थेट प्रवेश मिळणारे विद्यार्थी |

## परीक्षा देणारे शाखानिहाय विद्यार्थी

| | |
|---|---|
| बीए | १५ हजार |
| बीकॉम | १५ हजार |
| बीएस्सी | १५ हजार |
| एमए | १५०० |
| एमकॉम | ५ हजार |
| एमएस्सी | २५०० |
| अभियांत्रिकी | ९ हजार |
| बीबीए | १२०० |
| बीसीए | १८०० |
| एमसीए | २०० |
| एमबीए | १ हजार |
| उर्वरित पदविका, कौशल्य विकास व प्रमाणपत्र अभ्यासक्रम | |

पुढारी

# विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्याच परीक्षा होणार

**(पान १ वरून)** विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णयाची त्यांनी घोषणा केली. यूजीसीच्या निर्देशांनुसारच राज्यातील सर्व विद्यापीठांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा घेतल्या जातील. या परीक्षा १ ते ३० जुलै दरम्यान घेतल्या जातील. या परीक्षेवेळी सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळले जातील. सर्व विद्यापीठांकडून परीक्षेचे आणि वेळापत्रकाचे स्वतंत्रपणे नियोजन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या जे अभ्यासक्रम विविध सत्रांत विभागले आहेत, त्या अभ्यासक्रमांच्या शेवटच्या वर्षाच्या अंतिम सत्राचीच फक्त परीक्षा घेतली जाईल. त्याव्यतिरिक्त आधीच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागील वर्षाच्या आणि सध्या शिकत असलेल्या वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेऊन ग्रेडिंग पद्धतीने गुण देऊन पुढील वर्षात पाठवले जाईल, असे त्यांनी सांगितले. मागच्या वर्षाचा ५० टक्के परफॉर्मन्स आणि या वर्षाचा आत्तापर्यंतचा ५० टक्के परफॉर्मन्स अशा १०० टक्के परफॉर्मन्सच्या आधारावर हे गुणदान ठरवले जाणार आहे.

दरम्याच्या काळात कोरोनाच्या परिस्थितीनुसार लॉकडाऊन वाढल्यास २० ते २५ जूनच्या दरम्यान पुन्हा परीक्षांवर चर्चा होईल. त्यानुसार त्यावेळी निर्णय घेण्यात घेईल. मात्र विद्यार्थ्यांनी आपापल्या सत्राचा अभ्यास सुरू करावा, असे आवाहनही सामंत यांनी केले आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू आणि राज्य सरकारने मिळून विचारपूर्वक हा निर्णय घेतला आहे. यूजीसीच्या मार्गदर्शक शिफारशीनुसारच विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना ग्रेड सिस्टीमनुसार गुण द्यावेत, अशी भूमिका घेतली आहे. या पद्धतीनुसार जर कुठल्या विद्यार्थ्याला वाटले की, आपल्याला कमी गुण दिले गेले आहेत तर त्याला पुढच्या वर्षात ती परीक्षा पुन्हा देण्याचा देखील पर्याय देण्यात आला आहे. त्यांच्या परीक्षा स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करून घेतल्या जाणार आहेत. तसेच या ग्रेड सिस्टीममध्ये नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पुढच्या वर्षात दाखल केले जाईल. ज्या विषयांत हे विद्यार्थी नापास होतील, त्या विषयांच्या परीक्षा पुढच्या वर्षी बाकीच्या परीक्षांच्या वेळापत्रकानुसार घेतल्या जातील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

केटी लागलेल्या विद्यार्थ्यांना देखील पुढच्या वर्गात प्रवेश दिला जाईल. ज्या विषयात केटी लागल्या असतील, त्या परीक्षा नवीन वर्ष सुरू झाल्यानंतर १२० दिवसांत विद्यापीठांना घ्याव्या लागणार असल्याचेही मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. स्वायत्त विद्यापीठांनाही ही परीक्षा पद्धत लागू असून या निर्णयानुसार स्वायत्त विद्यापीठांनी परीक्षा निश्चित कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

**ऑनलाईन ओरल**

प्रॅक्टिकल्ससाठी ऑनलाईन ओरलचा पर्याय देखील विचाराधीन आहे. अंतिम सत्राच्या परीक्षांवर विद्यार्थ्यांचे करिअर अवलंबून आहे. अशा विद्यार्थ्यांची संख्या ८ ते ९ लाखांच्या घरात आहे.

**तालुका स्तरावर सीईटी परीक्षा**

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी सीईटी परीक्षा घेण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती सीईटी परीक्षेबाबत पुढील आठ दिवसांत निर्णय घेणार आहे. तसेच यंदा तालुका स्तरावर सीईटी परीक्षा घेण्याचा प्रयत्न असल्याचेही सामंत यांनी स्पष्ट केले.

**समुपदेशन केंद्र सुरू करा...**

परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात काही शंका असल्यास त्यावर मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठांनी दोन दिवसांत मार्गदर्शन आणि समुपदेशन केंद्र सुरू करावा, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठाना दिल्या आहेत.

Kolhapur Edition
9 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# परीक्षेविना आता थेट पुढील वर्षात

## कोरोनाचा असाही फायदा ; एक लाख ४० हजार विद्यार्थ्यांना लाभ, अभियांत्रिकीची परीक्षा होणार

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठातर्फे होणाऱ्या अंतिम वर्षातील ७५ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार असून, प्रथम व द्वितीय वर्षातील एक लाख ४० हजार विद्यार्थी पुढच्या वर्गात प्रवेश करणार आहेत. अभियांत्रिकीच्या नऊ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार असून, अन्य अभ्यासक्रमांत त्यांचा आकडा सर्वाधिक आहे.**

शासनाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संचारबंदी लागू केली आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू असून, रूग्णांचा आकडा वाढू नये, याची खबरदारी घेतली जात आहे. या स्थितीत परीक्षांच्या मुद्दा नेहमीच चर्चेत होता. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा पुढच्या वर्गातला प्रवेश निश्चित केला आहे. त्याचा शिवाजी विद्यापीठातील एक लाख ४० हजार विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. विद्यापीठातर्फे एकूण ६८० परीक्षा होतात. यंदा केवळ २०० परीक्षा होणार असून, शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. गजानन पळसे म्हणाले, ''परीक्षेचे वेळापत्रक येत्या काही दिवसांत तयार करणार आहोत. त्याचप्रमाणे अडचणी आल्यास त्या त्या अधिकारमंडळाची मान्यता घेणार आहोत. मार्गदर्शक तत्त्वे आल्यानंतर अनेक प्रश्नांची उत्तरे सुटतील.''

**सोशल मीडियावर शेरेबाजी**

परीक्षा रद्द झाल्याने प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी 'दाबात पास,' 'प्रमोशन,' 'झालं की आपलं पण चांगलं, आपण कोणाचं वाईट केलं नव्हत,' 'परीक्षा फी भरली याचे दुःख तर आहेच, पण १/३ झेरॉक्सचे पैसे वाचले याचा जास्त आनंद झाला, अखिल भारतीय बिनविरोध पास झालो रे संघटना,' तर परीक्षा देणाऱ्यांनी 'थोर लोकांच्या जीवनात संघर्ष असतो हे खरेच आहे,' 'आज जाहीर झालेल्या योजनेचा मी लाभार्थी नाही,' या आशयाचे मेसेज डीपी व स्टेट्सवर झळकवले.

**परीक्षा होणार हे गृहीत धरले होते. अभ्यास सुरू ठेवला होता. परीक्षा झाल्याने कोणताच तणाव नाही. उलट परीक्षेसाठी केलेला अभ्यास सार्थ ठरणार, याचाच आनंद आहे.**
- **मधुरिका मेस्त्री** (चतुर्थ वर्ष, सिव्हील इंजिनिअरिंग)

**परीक्षा होणार नाही, हे ऐकून वाईट वाटलं. परीक्षेसाठी जोरदार तयार केली होती. आता परीक्षा न देताच पुढच्या वर्गातला शिक्का बसणार. त्याचबरोबर गुणपत्रकावर गुण किती मिळणार, याचीही चिंता आहे.**
- **मयूरी वरपे** (बी. कॉम. द्वितीय वर्ष, न्यू कॉलेज)

**अभ्यासक्रमनिहाय परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या :**



| | |
|---|---|
| बी. ए, बी. कॉम, बी. एस्सी. | प्रत्येकी १५ हजार |
| इंजिनिअरिंग | ९ हजार |
| एम. ए. | १८०० |
| एम. एस्सी. | २५०० |
| एम. कॉम. | ५ हजार |
| बी. बी. ए. | १२०० |
| बी. सी. ए. | १८०० |
| एम. सी. ए. | २०० |
| एम. बी. ए. | १ हजार |

(उर्वरित पदविका व प्रमाणपत्र शाखा)

# 'रुडी शेडलक'ची विद्यापीठाला चाहूल

**शिवाजी विद्यापीठात रुडी शेडलक हा दुर्मिळ पक्षी आढळल्याने प्राणी, पक्षीजीवन अधिक समृद्ध झालं आहे. प्राणी, पक्षी आणि विविध फुलझाडांचा हा परिसर अधिक बहरला आहे.**



दुर्मिळ रुडी शेलडक शास्त्रीय नाव टॅडोर्ना फेरुजीनिया हा दुर्मिळ स्थलांतरित पक्षी शिवाजी विद्यापीठाच्या आवारात निदर्शनास आला. प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. सुनील गायकवाड यांच्यासह संशोधक विद्यार्थ्यांनी हा पक्षी दिसताच त्याची माहिती संकलित करून नोंद केली. नऊ मे रोजी होणाऱ्या जागतिक स्थलांतरीत पक्षीदिनाच्या पूर्वदिनीच विद्यापीठ परिसरात बागडणारा हा रुडी शेडलक दिसुन आला.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने सध्या पृष्ठवंश प्राण्यांचे संशोधन सुरु आहे. यादृष्टीने विद्यापीठाच्या आवारात अभ्यास करत असताना डॉ. गायकवाड यांना दोन महिन्यांपूर्वी ७ मार्च रोजी हा पक्षी दिसला होता. विद्यापीठ आवारातील खांडेकर भाषा भवनच्या मागील तलावात विहार करताना पाहण्यात आला. त्यावेळी या पक्ष्याची छायाचित्रे काढण्यात आली होती. या पक्ष्याची शास्त्रीय माहिती संकलित करण्याचे काम सुरु होते. या स्थलांतरित पक्ष्याविषयी माहिती देताना डॉ. गायकवाड म्हणाले, 'विशिष्ट हंगामात देशात साडेतीनशेपेक्षा अधिक पक्षी स्थलांतरित होत असतात. देशातील दुर्मिळ स्थलांतरित पक्ष्यांच्या यादीत रुडी शेलडक हा पक्षी असून त्याला भारतीय भाषेत ब्राह्मणी बदक असेही संबोधले जाते. २३ ते २८ इंच लांब आणि सव्वा किलो वजनाच्या या पक्ष्याचे डोके गुलाबी रंगाचे तर पिसे तपकिरी झाक असलेली केशरी रंगाची असतात. शेपटीकडे पिसांचा रंग काळा असतो. भारतीय उपखंड प्रदेशात हिवाळ्यातील मुक्काम आटपून हा पक्षी स्थलांतरणासाठी २६०० किलोमीटर प्रवास करतो. सहा हजार मीटर उंचीपर्यंत जाण्याची या पक्ष्याची क्षमता असल्याने जम्मू काश्मीर परिसरातील उंचावरील तलावातही याचा वावर असतो.





स्थलांतरीत पक्ष्यांसाठी आवश्यक असलेले वातावरण, जलस्त्रोत, पाणवठे शिवाजी विद्यापीठात पोषक आहेत. स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रजाती नष्ट होण्यामध्ये प्रदूषण हा महत्त्वाचा अडथळा आहे. त्यामुळे स्थलांतरित पक्ष्यांच्या आकर्षित करणाऱ्या पाणवठ्यांना प्रदूषण मुक्त करण्याची गरज आहे. सध्या लॉकडाउनमुळे हवा व जल प्रदूषणात कमालीची घट झाल्याने स्थलांतरित पक्षी आढळून येत आहेत. – प्रा. डॉ. सुनील गायकवाड, प्राणीशास्त्र विभाग

# अंतिम वर्ष वगळता विद्यापीठांच्या इतर परीक्षा रद्द

*(पान १ वरून)* ऑगस्टपर्यंत निकाल जाहीर करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. मात्र गरज भासल्यास २० जून रोजी परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार निर्णयात बदल करण्यात येतील, असे सामंत यांनी सांगितले. फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## उपस्थितीबाबत नियम...

- टाळेबंदीच्या कालावधीत विद्यार्थ्यांची उपस्थिती गृहित धरण्यात येईल.
- उन्हाळी सुट्टीबाबत विद्यापीठ त्यांच्या स्तरावर निर्णय घेईल.
- विद्यार्थी व पालक यांच्या शंकाचे निरसन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सामुपदेशन केंद्र स्थापन करण्यात येईल.
- गोंडवाना विद्यापीठ हे सुरक्षित क्षेत्रात (ग्रीन झोन) येत असल्यामुळे तेथील तेथील परिस्थिती पाहून विद्यापीठ वेळापत्रक निश्चित करेल.
- एसएनडीटी विद्यापीठाच्या राज्यातील महाविद्यालयीन परीक्षा या वेळापत्रकानुसारच होतील. इतर राज्यातील परीक्षा तेथील परिस्थितीनुसार होतील.

## परीक्षा आणि मूल्यांकन कसे?

- चार वर्षांच्या अभ्यासक्रमातील केवळ आठव्या सत्राची, पाच वर्षांच्या अभ्यासक्रमातील फक्त दहाव्या सत्राची, तर द्विवार्षिक अभ्यासक्रमाच्या केवळ चौथ्या सत्राची परीक्षा होईल.
- वार्षिक परीक्षा असणाऱ्या अभ्यासक्रमाच्या केवळ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार नाहीत त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल.
- विद्यार्थी शिकत असलेल्या वर्षातील किंवा सत्रातील अंतर्गत मूल्यमापनाचे ५० टक्के आणि आधीच्या सत्रातील किंवा वर्षातील ५० टक्के गुण ग्राह्य धरून मूल्यांकन करण्यात येईल.
- पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांचे फक्त अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ग्राह्य धरून सरासरी काढण्यात येईल.
- या मूल्यांकनानुसार अनुत्तीर्ण झाल्यास किंवा 'एटीकेटी' असल्यास विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश मिळेल. मात्र, राहिलेल्या सर्व विषयांत पुढील परीक्षेत विद्यार्थ्याला उत्तीर्ण व्हावे लागेल.
- शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर चार महिन्यात ही परीक्षा घेण्यात येईल.
- विद्यार्थ्यांना निकालात सुधारणा करायची असल्यास पुढील परीक्षा देता येईल. ही परीक्षा ऐच्छिक असेल.
- अंतिम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या नसल्यास विद्यार्थ्यांचा प्रकल्प, प्रयोगवही यांच्या आधारे किंवा ऑनलाईन तोंडी परीक्षा घेऊन मूल्यांकन करण्यात येईल.

# केवळ अंतिम वर्षाच्याच परीक्षा

म. टा. प्रतिनिधी, पुणे/मुंबई

राज्य सरकारने अकृषी विद्यापीठांतील केवळ अंतिम वर्षांच्या परीक्षा घ्यायचा निर्णय घेतला आहे. सर्व अभ्यासक्रमांच्या इतर सर्व वर्षांच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. कला, विज्ञान, वाणिज्य, इंजिनीअरिंग, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, मॅनेजमेंट आदी शाखांच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शेवटच्या वर्षांच्या परीक्षा होतील.

## विद्यापीठाच्या अन्य वर्षांच्या परीक्षा रद्द

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे अंतिम वर्षांच्या परीक्षा एक ते ३१ जुलै या कालावधीत घेण्यात येतील. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून ही माहिती दिली. केवळ अंतिम वर्षांच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इतर कोणत्याही वर्षांच्या परीक्षा घेण्यात येणार नाहीत. या वर्षांच्या विद्यार्थ्यांच्या पूर्वकामगिरीनुसार त्यांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. त्यांना या पूर्वीच्या परीक्षेत मिळालेले गुण व वार्षिक मूल्यांकनाच्या आधारावर श्रेणी देण्यात येणार आहे. मात्र, त्यात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पुढील वर्गात प्रवेश देण्यात येणार असून, त्यांना पुढील चार महिन्यांत परीक्षेची संधी देण्यात येणार आहे. त्यांना पुढील परीक्षेत उर्वरित सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल.

निकाल सुधरायचा असल्यास किंवा कमी गुण मिळाल्यासही पुढील परीक्षेची संधी देण्यात येणार असून, ही परीक्षा ऐच्छिक असेल. 'विद्यापीठांच्या परीक्षांचे नियोजन जुलैमध्ये करून १५ ऑगस्टपर्यंत निकाल जाहीर करण्याचे नियोजन केले जाईल. गरज भासल्यास २० जून रोजी परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार निर्णयात बदल करण्यात येतील,' असे सामंत यांनी सांगितले.

▸▸ संबंधित वृत्त... २

# अंतिम सत्राच्या परीक्षा होणार : सामंत

» पान १ वरून
वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेऊन श्रेणी पद्धतीने गुण देऊन पुढील वर्षात पाठवले जाणार आहे, अशी घोषणा त्यांनी केली. त्यासोबतच सर्व अभ्यासक्रमांच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षादेखील यूजीसीच्या निर्देशांनुसार १ ते ३० जुलैदरम्यान सोशल डिस्टन्सिंगचे सर्व नियम पाळून घेतल्या जातील, असेदेखील त्यांनी जाहीर केले.

राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू आणि राज्य सरकारने मिळून विचारपूर्वक हा निर्णय घेतला आहे. सध्याचे कोरोनाचे संकट आणि लॉकडाउनचा कालावधी लक्षात घेता अंतिम वर्गातील अंतिम सत्राची परीक्षा सोडून इतर विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता आधीच्या गुणांच्या आधारावर पुढील वर्गात पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय घेताना मागच्या वर्षाचा ५० टक्के परफॉर्मन्स आणि या वर्षाचा आतापर्यंतचा ५० टक्के परफॉर्मन्स अशा आधारावर हा निर्णय घेण्यात आला आहे. यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना श्रेणी पद्धतीनुसार गुण द्यावेत अशी भूमिका घेतली आहे, असे सामंत यांनी जाहीर केले.

या पद्धतीनुसार जर कुठल्या विद्यार्थ्याला वाटले की आपल्याला कमी गुण दिले गेले आहेत, तर त्याला पुढच्या वर्षात ती परीक्षा पुन्हा देण्याचादेखील पर्याय देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना जर पुढच्या वर्षात गेल्यावर वाटले, की आपल्याला देण्यात आलेले गुण कमी आहेत, तर त्यांना ऐच्छिक परीक्षा देण्याची मुभा असेल. त्यांच्या परीक्षा विद्यापीठांनी वेळापत्रक जाहीर करून घ्याव्यात. तसेच या श्रेणी पद्धतीमध्ये नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांनादेखील पुढच्या वर्षात दाखल केले जाईल. ज्या विषयांत हे विद्यार्थी नापास होतील, त्या विषयांच्या परीक्षा पुढच्या वर्षी बाकीच्या परीक्षांच्या वेळापत्रकानुसार घेतल्या जातील, असे उदय सामंत म्हणाले. केटी लागलेल्या विद्यार्थ्यांनादेखील पुढच्या वर्गात प्रवेश दिला जाईल. ज्या विषयात केटी लागल्या असतील, त्या परीक्षा नवीन वर्ष सुरू झाल्यानंतर १२० दिवसांत विद्यापीठांना घ्याव्या लागतील, असे ते म्हणाले. त्याचप्रमाणे लॉकडाऊनच्या ४५ दिवसांच्या कालावधीत विद्यार्थ्यांची महाविद्यालयात उपस्थिती ग्राह्य मानली जाणार असल्याचे सामंत यांनी जाहीर केले.

### विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन

परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात काही शंका असल्यास त्यावर मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठांनी दोन दिवसांत सेल सुरू करावा, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठाना दिल्या आहेत.

पुढारी

# विद्यापीठात संसर्गजन्य आजार टेस्टिंग लॅब होणार

## चार सदस्यीय समिती स्थापन; जिल्हा प्रशासनास फेरप्रस्ताव सादर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात साथीच्या आजारांचे निदान करणारी कायमस्वरूपी टेस्टिंग लॅब प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. याबाबतचा फेरप्रस्ताव विद्यापीठाकडून जिल्हा प्रशासनास सादर करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या वतीने चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने कायमस्वरूपी टेस्टिंग लॅब उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला सादर केला. पालकमंत्री सतेज पाटील यांच्यासह जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच बैठक झाली. जिल्हा प्रशासनाकडून फेरप्रस्ताव सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या.

विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी बैठक झाली. बायोकेमिस्ट्री विभागाच्या डॉ. जे. पी. जाधव यांच्यासह चार जणांची समिती नेमण्यात आली आहे. यावेळी आर्किटेक्चर विभागाने टेस्टिंग लॅबचा प्लॅन सादर केला. इंजिनिअरिंग सेक्शनला सेंट्रल फॅसिलिटी सेंटर (सीएफसी) सेंटर येथे होणाऱ्या लॅबसाठी आवश्यक त्या तरतूद करण्याच्या सूचना देण्यात आल्या. टेस्टिंग लॅबसाठी आवश्यक उपकरणे खरेदीबाबत चर्चा झाली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एम. एस. निंबाळकर आदी उपस्थित होते.

> “कोरोना संकटाच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत विद्यापीठ प्रशासनाने कोरोनासह अन्य संसर्गजन्य आजारासंदर्भातील टेस्टिंग लॅब उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यात टेस्टिंगसह विविध संसर्गजन्य रोगावर संशोधन, अध्ययन चालणार आहे. याचा कोल्हापूरसह जवळच्या परिसरास फायदा होणार आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे,**
>
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

Kolhapur Edition
9 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# १ लाख ४० हजार विद्यार्थ्यांना मिळणार पुढील वर्षात प्रवेश

प्रतिनिधी

कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विद्यापीठाच्या अंतिम सत्रातील परीक्षा वगळता सर्व परीक्षा रद्द करण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी घेतला. यामुळे शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पदवी प्रथम, द्वितीय वर्ष अभ्यासक्रम तसेच पदव्युतर प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या सुमारे १ लाख ४० हजार विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेश मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांचा समावेश आहे. उन्हाळी सत्रामध्ये ६८० परीक्षा घेण्यात येणार होत्या. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष स्थगीत केले होते. यामुळे अंतिम परीक्षा रद्द होणार की त्या पुढे घेतल्या जाणार याकडे विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष होते. दरम्यान शुक्रवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी अंतीम वर्षाच्या परीक्षा होणार व इतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहिर केला. यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला.

**राज्य शासनाच्या निर्णयाने विद्यार्थ्यांना दिलासा**

उन्हाळी सत्रामध्ये ६८० परीक्षा होत्या. मात्र आता अंतिम वर्षाच्या अखेरच्या सत्राच्या २०० परीक्षा असून ७४ हजार विद्यार्थी आहेत. बी. ए. (१५०००), बी. कॉम (१५०००), बी. एस्सी (१५०००, अभियांत्रिकी (१०००),एम. ए. (१८००, एम. एस्सी (२५००), एम. कॉम (५०००),बी. बी. ए. (१२००),बी.सी.ए (१८००), एम.सी.ए (२००, एम. बी. ए. (१०००) यासह उर्वरीत डिप्लोमा, सर्टिफिकेट कोर्सच्या विद्यार्थी आहेत.

तरुण भारत Sat, 09 May 2020
https://epaper.tarunbharat.co

# अंतिम सत्राच्या परीक्षा होणार : सामंत

**सकाळ वृत्तसेवा**



**उदय सामंत**

मुंबई, ता. ८ : विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत; तर इतर वर्षांतील विद्यार्थ्यांना मागील सत्रातील गुणांच्या आधारे पुढील वर्गात पाठविण्यात येणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज हा निर्णय जाहीर केला.

सामंत यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून राज्यातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली. यूजीसीच्या निर्देशांनुसारच अंतिम सत्राच्या परीक्षा घेतल्या जातील, असे सामंत यांनी स्पष्ट केले. १ ते ३० जुलैदरम्यान अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याचे यूजीसीचे निर्देश आहेत. त्यानुसारच परीक्षा होतील. या परीक्षेवेळी सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळले जातील. प्रॅक्टिकल्ससाठी ऑनलाईन तोंडी परीक्षेचा पर्यायही विचाराधीन आहे. लॉकडाउन वाढल्यास २० ते



२५ जूनच्या दरम्यान पुन्हा या सर्व मुद्द्यांवर चर्चा होईल असे ते म्हणाले. सध्या जे कोर्स सुरू आहेत, त्यामध्ये अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राचीच फक्त परीक्षा घेतली जाईल. त्याव्यतिरिक्त आधीच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागील वर्षाच्या आणि या

**पान ७ वर »**

## तालुका स्तरावर सीईटी परीक्षा

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी सीईटी परीक्षा घेण्याबाबत समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती सीईटी परीक्षेबाबत पुढील आठ दिवसांत निर्णय घेईल. तसेच, यंदा तालुका स्तरावर सीईटी परीक्षा घेण्याचा प्रयत्न असल्याचेही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

## स्वायत्त विद्यापीठांनाही ही परीक्षा पद्धत लागू

राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षेबाबत घेतलेला निर्णय स्वायत्त विद्यापीठांनाही लागू असल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. या निर्णयानुसार स्वायत्त विद्यापीठांनी परीक्षा निश्चित कराव्यात, असेही ते म्हणाले. 'यूजीसी'च्या सूचनेनुसार या सूचना करण्यात आल्याचेही श्री. सामंत यांनी नमूद केले.

# विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्याच परीक्षा होणार

## मूल्यांकनाच्या आधारे पहिल्या, दुसऱ्या वर्षाचे विद्यार्थी पुढील वर्गात

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील विद्यापीठांतील पदवी अभ्यासक्रमातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्राच्याच परीक्षा घेण्यात येणार आहेत. तर इतर वर्षातील विद्यार्थ्यांना ५० टक्के मागील वर्षीचा परफॉर्मन्स आणि ५० टक्के सध्याच्या सत्रातील परफॉर्मन्स लक्षात घेऊन श्रेणी व गुण दिले जातील. त्यानुसारच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश दिला जाणार असल्याचे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दुपारी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून जाहीर केले. पदवी आणि पदव्युत्तर **पान ७ वर**

**लॉकडाऊनच्या ४५ दिवसांच्या कालावधीत विद्यार्थ्यांची महाविद्यालयात उपस्थिती ग्राह्य धरणार.**

**विद्यार्थ्यांना पुढच्या वर्षात गेल्यावर गुण कमी असल्याचे वाटल्यास त्यांना ऐच्छिक परीक्षा देण्याची मुभा**

**विद्यार्थ्याला वाटले की, आपल्याला कमी गुण दिले गेले आहेत; तर त्याला पुढच्या वर्षात ती परीक्षा पुन्हा देण्याचा पर्याय**

**विद्यार्थी नापास होईल, त्या विषयांच्या परीक्षा पुढच्या वर्षी उर्वरित परीक्षांच्या वेळापत्रकानुसार**

**संबंधित विद्यापीठांनी वेळापत्रक जाहीर करून परीक्षा घ्याव्यात**

# Varsity exam only for final-year students, others to be promoted

**SwatiShindeGole**
@timesgroup.com

**Pune:** University students not in the final semester of graduation and postgraduation will be promoted automatically without having to appear for any exam, state higher and technical education minister Uday Samant announced on Friday.

Only those in the final semester will have to appear for exams to be held between July 1 and 30, he said.

He also said that if the lockdown is extended further, a review of the final-semester exams will be carried out between June 20 and 25. The new academic year will begin on September 1 and the results will be announced by August 15.

Students not in the final semester will be promoted and graded based on their performance in previous semesters along with their performance in the current semester. "Those who fail in this grading will also be promoted, but they will have to appear for a re-exam in the new academic year," said Samant. "Students studying on allowed to keep terms (ATKT) scheme will also be promoted. They will also appear for the exam in new academic year. Every university will announce its own schedule of exams for final-semester students and also for repeaters once the academic year starts," he said.

▶Continued on P 6

**HOW WILL STUDENTS BE PROMOTED?**

- A 50:50 gradation formula will be used – 50% performance of previous semester and remaining 50% based on current semester
- Students who fail in this formula will also be promoted
- Students can also appear for class improvement if they are not satisfied with their grades
- The exams for students falling under class improvement, ATKT and failed subject categories will be conducted after the new academic year begins
- Autonomous universities have also been advised to follow the same rules
- SNDT University will also have to follow the same rules

# कोल्हापुरात 'ब्राह्मणी बदक'चे दर्शन!

**लोकसत्ता प्रतिनिधी**





**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात पक्षी अभ्यासकांना 'ब्राह्मणी बदक' (रुडी शेलडक/ टॅडोर्ना फेरुजीनिया) हा स्थलांतरित पक्षी आढळला आहे. अलीकडच्या काळात प्रथमच हा पक्षी विद्यापीठ परिसरात आढळल्याचे अभ्यासकांनी म्हटले आहे. उद्या शनिवारी (९ मे) साजऱ्या होणाऱ्या जागतिक स्थलांतरित पक्षी दिनाच्या पार्श्वभूमीवर प्राणिशास्त्र अधिविभागाकडून ही माहिती आज देण्यात आली आहे.

प्राणिशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सुनील एम. गायकवाड विद्यापीठ परिसरातील पृष्ठवंशीय प्राण्यांवर काम करीत आहेत.

'ब्राह्मणी बदक' (रुडी शेलडक) हा स्थलांतरित पक्षी त्यांना सर्वप्रथम ७ मार्च रोजी वि.स. खांडेकर भाषा भवनच्या पिछाडीस असलेल्या तलावामध्ये आढळला. ह्या पक्ष्याची नोंद करून त्यांनी त्याची छायाचित्रे घेतली आहेत. यावरून विद्यापीठ परिसरातील पाणवठे जैवविविधतेसाठी अत्यंत पोषक असून शिवाजी विद्यापीठ जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या कामी योगदान देत असल्याचे अधोरेखित होते.

भारतातील अनेक स्थलांतरित पक्ष्यांपैकी 'रुडी शेलडक' (टॅडोर्ना फेरुजीनिया) असून त्याला भारतात 'ब्राह्मणी बदक' म्हणूनही ओळखतात. पक्ष्याची लांबी २३ ते २८ इंच व वजन साधारण सव्वा किलो असते. याचे डोके फिकट गुलाबी असून पिसे नारंगी–तपकिरी रंगाची तर शेपटीकडील पिसे काळी असतात. भारतीय उपखंडात हिवाळ्यात आगमन करतो आणि एप्रिलमध्ये परत जातो. हा सुमारे २६०० कि.मी. प्रवास करू शकतो आणि जवळपास ६ हजार मीटर उंचीवर पोचू शकतो. जम्मू–काश्मीरमधील अति उंचीवरील तलावात आणि दलदलीमध्ये ते प्रजनन करतात. हा बदक मुख्यतः तलाव, जलाशय आणि नद्यांसारख्या पाणथळ जागी राहतो.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठांतर्गत १ लाख ४० हजार विद्यार्थ्यांना दिलासा

## पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्षाचे ७५ हजार विद्यार्थी देणार परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या अंतिम सत्रातील परीक्षा वगळता सर्व परीक्षा रद्द केल्याने शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पदवी प्रथम, द्वितीय वर्ष अभ्यासक्रम व पदव्युतर प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या सुमारे १ लाख ४० हजार विद्यार्थ्यांना पुढच्या वर्षात प्रवेश दिला जाणार असल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांचा समावेश आहे. उन्हाळी सत्रात ६८० परीक्षा घेण्यात येणार होत्या; मात्र आता विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या अखेरच्या सत्राच्या २०० परीक्षा होणार असून ७५ हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. यात बी.ए. (१५०००), बी.कॉम. (१५०००), बी.एस्सी. (१५०००), अभियांत्रिकी (९०००), एम.ए. (१८००), एम.एस्सी. (२५००), एम. कॉम. (५०००), बी.बी.ए. (१२००), बी.सी.ए. (१८००), एम. सी. ए. (२००), एम.बी.ए. (१०००) यासह उर्वरित डिप्लोमा, सर्टीफिकेट, इंटिग्रेटेड अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचा समावेश आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# विद्यापीठाच्या कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय कौशल्य व उद्योजकता ऑनलाइन कार्यशाळेला विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांसह महाराष्ट्राच्या विविध भागांतूनही उत्तम प्रतिसाद लाभला.

सुमारे २७० प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी कार्यशाळेत सहभागी झाले.

पहिल्या सत्रामध्ये डॉ. ए. एम. गुरव यांनी 'कौशल्य व उद्योजकता विकास' या विषयावर मार्गदर्शन



केले. त्यांनी कोविड-१९ मुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणी सांगून या काळात उद्योगाच्या नवीन संधी कशा निर्माण होतील, याबाबत मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी 'चिकित्सक विचार व कौशल्य विकास' या विषयावर मार्गदर्शन केले.

महेश चव्हाण यांनी शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकासासाठी राबवित असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. तिसऱ्या सत्रात डॉ. कृष्णा पाटील यांनी 'उद्योजकता विकास व कौशल्य अंतर विश्लेषण' या विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. ए. एम. गुरव व महेश चव्हाण यांनी या ऑनलाइन कार्यशाळेचे समन्वयन केले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# विद्यापीठात आढळला दुर्मिळ 'रुडी शेलडक'

## प्राणिशास्त्र अधिविभागाची माहिती; भारतात 'ब्राह्मणी बदक' म्हणून ओळख

कोल्हापूर, ता. ८ : रुडी शेलडक (टॅडोर्ना फेरुजीनिया) वाच्या स्थलांतरित पक्षी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात ाणिशास्त्र अधिविभागातील संशोधकांना आढळला आहे. भारतात 'ब्राह्मणी बदक' म्हणून तो ओळखला जातो. अलीकडच्या काळात प्रथमच हा पक्षी विद्यापीठ परिसरात निदर्शनास आल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. उद्या (ता. ९ मे) साजऱ्या होणाऱ्या जागतिक स्थलांतरित पक्षी दिनाच्या पार्श्वभूमीवर प्राणिशास्त्र अधिविभागाकडून ही माहिती दिली आहे.

अधिविभागातील प्रा. डॉ. सुनील एम. गायकवाड विद्यापीठ परिसरातील पृष्ठवंशीय प्राण्यांवर काम करत आहेत. रुडी शेलडक हा स्थलांतरित पक्षी त्यांना सर्वप्रथम ७ मार्चला वि. स. खांडेकर भाषा भवनच्या पिछाडीस असलेल्या तलावामध्ये आढळला. या पक्षाची नोंद करून त्यांनी त्याची छायाचित्रे घेतली आहेत.

**» जागतिक स्थलांतरित पक्षी दिन विशेष**



विद्यापीठात आढळलेला रुबी शेलडक.

### वैशिष्ट्ये

- लांबी : २३ ते२८ इंच
- वजन : सव्वा किलो
- डोके : फिकट गुलाबी,
- पिसे : नारंगी-तपकिरी,
- शेपटीकडील पिसे : काळी
- भारतीय उपखंडात आगमन : हिवाळ्यात
- परत जातो : एप्रिलमध्ये परत
- प्रवास किती करतो : तो सुमारे २६०० किलोमीटर
- किती उंचीवर पोचू शकतो : जवळपास ६००० मीटर

**"दरवर्षी ९ मे दिवस जागतिक स्थलांतरित पक्षी दिन म्हणून जगभरात साजरा होतो. यंदाच्या पक्षी दिनाचा विषय 'बर्डस कनेक्ट अवर वर्ल्ड' हा आहे. जगभरातील स्थलांतरित पक्ष्यांचे मार्ग शोधण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रॅकिंग तंत्रज्ञानाचा संबंधित पक्ष्यांच्या संवर्धनासाठी अधिक प्रभावीपणे कसा उपयोग करता येईल, यावर जगभरातील पक्षी तज्ज्ञांनी लक्ष केंद्रित केले आहे.**

**- प्रा. डॉ. सुनील गायकवाड**

पुढारी

# रुडी शेलडक पक्ष्याची विद्यापीठ परिसरात नोंद

## प्रथमच निदर्शनास; पाणवठे जैवविविधतेसाठी पोषक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'रुडी शेलडक' (टॅडोर्ना फेरुजीनिया) नावाचा स्थलांतरित पक्षी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात प्राणीशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सुनील गायकवाड यांना आढळला आहे. अलीकडच्या काळात प्रथमच हा पक्षी विद्यापीठ परिसरात निदर्शनास आल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. 'रुडी शेलडक' हा स्थलांतरित पक्षी त्यांना ७ मार्च २०२० रोजी वि.स. खांडेकर भाषा भवनच्या पिछाडीस असलेल्या तलावात आढळला.

भारतातील अनेक स्थलांतरित पक्ष्यांपैकी 'रुडी शेलडक' असून त्याला भारतात 'ब्राह्मणी बदक' म्हणून ओळखतात. या पक्ष्याची लांबी २३ ते २८ इंच आणि वजन सव्वा किलो असते. डोके फिकट गुलाबी असून पिसे नारंगी-तपकिरी रंगाची तर शेपटीकडील पिसे काळी असतात. हा प्रवासी पक्षी भारतीय उपखंडात हिवाळ्यात आगमन करतो व एप्रिलमध्ये परत जातो. हा सुमारे २६०० कि.मी. प्रवास करू शकतो व जवळपास ६००० मीटर इतक्या उंचीवर पोहोचू शकतो.

**जागतिक स्थलांतरित पक्षी दिन विशेष...**

जम्मू-काश्मीरमधील अतिउंचीवरील तलावात, दलदलीमध्ये ते प्रजनन करतात. जगामध्ये याचा आढळ उत्तर-पश्चिम आफ्रिका, इथिओपिया, दक्षिण-पूर्व युरोप ते दक्षिण-पूर्व चीनपर्यंत व दक्षिण आशियामध्ये आहे. बौद्ध लोक या पक्षास पवित्र मानतात. त्यामुळे मध्य व पूर्व आशियात पक्ष्यांना काही प्रमाणात संरक्षण मिळते, जिथे यांची संख्या स्थिर किंवा वाढत असल्याचे दिसते. हे बदक मुख्यत: तलाव, जलाशय आणि नद्यांसारख्या पाणथळ जागी राहतात, अशी माहिती डॉ. गायकवाड यांनी दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवनालगतच्या तलावात आढळलेला रुडी शेलडक.**

> जागतिक पक्षी कोषानुसार जिल्ह्यात ४४१ पक्ष्यांचा आढळ आहे. रंकाळा व कळंबा तलाव परिसरात आतापर्यंत २७ स्थलांतरित पक्षांची नोंद झाल्याची माहिती आहे. विद्यापीठ परिसर जैवविविधतेसाठी नंदनवन आहे. भविष्यात जिल्ह्यातील पाणथळ जागा प्रदूषणमुक्त करून त्यांचे संवर्धन केल्यास स्थलांतरित पक्षी कोल्हापूर परिसरात येतील.
>
> **- डॉ. सुनील गायकवाड**

लोकमत

## महत्त्वाचे

# 'कौशल्य विकास'वर चर्चा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित कौशल्य व उद्योजकता ऑनलाईन कार्यशाळेत सुमारे २७० प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाल्या. कार्यशाळेत डॉ. ए. एम. गुरव यांनी वेगवेगळे उद्योग कशाप्रकारे सुरु करता येतील. त्यासाठी कोणती कौशल्ये आत्मसात करावी लागतील, याबाबतची माहिती दिली. यावेळी डॉ. विद्यानंद खंडागळे, महेश चव्हाण यांनीही मार्गदर्शन केले. रोजगारक्षम विद्यार्थ्यांमधून यशस्वी उद्योजक घडविता येतील, असे डॉ. कृष्णा पाटील यांनी सांगितले.

लोकमत

इतर सत्रांतील विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश : १ सप्टेंबरपासून नवे शैक्षणिक वर्ष

# अंतिम वर्षाच्या, अंतिम सत्राच्या परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयस्तरांवरील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या केवळ अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा १ जुलै ते ३० जुलैदरम्यान होणार असून, नवीन शैक्षणिक वर्ष १ सप्टेंबरपासून सुरू होईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली.

इतर सत्रांच्या परीक्षा होणार नसून त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल. हा प्रवेश देताना त्यांचे ग्रेड्स व गुणही त्यांना दिले जातील, असेही सामंत यांनी स्पष्ट केले. ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार नाहीत, त्यांना अंतर्गत मूल्यमापनावर ५० टक्के ग्रेड व ५० टक्के यापूर्वीच्या सत्रातील परीक्षेचे गुण यावरून ठरणार आहे. पूर्वीच्या परीक्षा किंवा सत्रांचे गुण उपलब्ध नसल्यास वार्षिक सत्राच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षांबाबत १०० टक्के अंतर्गत मूल्यमापन करण्यात येईल. या गुणांबाबत काही शंका असल्यास तसेच त्यामध्ये सुधारणा करण्याची विद्यार्थ्यांची इच्छा असल्यास त्याला ऐच्छिक परीक्षा देता येईल. अशा प्रकारच्या परीक्षांबाबत विद्यापीठस्तरावर निर्णय घेण्यात येईल. एखादा विद्यार्थी या परीक्षांमध्ये नापास झाला असेल तर त्यालाही पुढील वर्षात प्रवेश मिळेल, पण त्याला नापास झालेल्या विषयांची परीक्षा द्यावी लागेल. यासाठीच्या वेळापत्रकाचा निर्णय विद्यापीठस्तरावर घेण्यात येईल. एटीकेटीच्या विद्यार्थ्यांनाही हाच नियम लागू असेल.



## सीईटीचा निर्णय येत्या आठ दिवसांत

सामाईक प्रवेश परीक्षांबाबत (सीईटी) नियोजनासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असून, त्या समितीकडून येत्या ८ दिवसांत सीईटी परीक्षेचा निर्णय जाहीर करण्यात येईल. जिल्हास्तरावरील सीईटीचे सेंटर्स तालुकास्तरावर घेता येतील का, याचे नियोजन करण्याचा प्रयत्न या परीक्षेसाठी करण्यात येईल, अशी माहितीही सामंत यांनी दिली.

Kolhapur Main
Page No. 1 May 09, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

## प्राणीशास्त्र अधिविभागाने दिली माहिती : जागतिक स्थलांतरित पक्षी दिन आज

# विद्यापीठ परिसरात आढळला 'रुडी शेलडक'

लोकमत न्यूज नेटवर्क

**28** इंच पक्षाची लांबी

**1.25** किलो वजन



**2600** कि.मी. प्रवास करतो

**6000** मी. उंचीपर्यंत पोहोचतो

**'बर्डस् कनेक्ट अवर वर्ल्ड'** : दरवर्षी ९ मे हा दिवस 'जागतिक स्थलांतरित पक्षी दिन' म्हणून साजरा केला जातो. यंदाच्या पक्षीदिनाचा विषय 'बर्डस् कनेक्ट अवर वर्ल्ड' असा आहे.



बौद्ध लोक या पक्षास पवित्र मानतात. त्यामुळे मध्य व पूर्व आशियामध्ये त्यांना काही प्रमाणात संरक्षण मिळते. तेथे यांची संख्या स्थिर किंवा वाढत असल्याचे मानले जाते. तो मुख्यत: तलाव, जलाशय, नद्यांसारख्या पाणथळ जागी राहतो.

\- **प्रा. डॉ. सुनील गायकवाड,** प्राणीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.

**कोल्हापूर :** 'रुडी शेलडक' (टॅडोर्ना फेरुनिया) नावाचा स्थलांतरित पक्षी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात प्राणीशास्त्र अधिविभागातील संशोधकांना आढळला. अलीकडच्या काळात प्रथमच हा पक्षी विद्यापीठ परिसरात निदर्शनास आल्याचे या संशोधकांनी म्हटले आहे. आज, शनिवारी साजऱ्या होणाऱ्या 'जागतिक स्थलांतरित पक्षी दिना'च्या पार्श्वभूमीवर प्राणीशास्त्र अधिविभागाकडून ही माहिती देण्यात आली.

प्राणीशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सुनील एम. गायकवाड विद्यापीठ परिसरातील पृष्ठवंशीय प्राण्यांवर काम करत आहेत. 'रुडी शेलडक' हा स्थलांतरित पक्षी त्यांना सर्वप्रथम ७ मार्चला वि. स. खांडेकर भाषा भवनच्या पिछाडीस असलेल्या तलावामध्ये आढळला. या पक्षाची नोंद करून त्यांनी त्याची छायाचित्रे घेतली. भारतातील अनेक स्थलांतरित पक्षांपैकी 'रुडी शेलडक' असून, त्याला भारतात 'ब्राह्मणी बदक' म्हणूनही ओळखतात.

या विशिष्ट पक्षाची लांबी २३ ते २८ इंच इतकी व वजन सव्वा किलो असते. त्याचे डोके फिकट गुलाबी असून पिसे नारंगी-तपकिरी रंगाची तर शेपटीकडील पिसे काळी असतात. तो भारतीय उपखंडांत हिवाळ्यात आगमन करतो आणि एप्रिलमध्ये परत जातो.

हा सुमारे २६०० किलोमीटर इतका प्रवास करू शकतो आणि जवळपास ६००० मीटर इतक्या उंचीवर पोहोचू शकतो.

जगामध्ये याचा आढळ उत्तर-पश्चिम आफ्रिका, इथिओपिया, दक्षिण-पूर्व युरोप ते मध्य-आशिया ओलांडून दक्षिण-पूर्व चीनपर्यंत व दक्षिण आशियामध्ये आहे, अशी माहिती प्राणीशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. सुनील गायकवाड यांनी शुक्रवारी दिली.

लोकमत

## अंतिम वर्ष : विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी स्वतंत्र कक्ष सुरु करणार

# शिवाजी विद्यापीठातील ७५ हजारजणांची परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या एकूण ७५ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे.

प्रथम, द्वितीय वर्षांचे १ लाख ४० हजार विद्यार्थी पुढील वर्गात विनापरीक्षा प्रवेशित होतील. अंतिम वर्षांची परीक्षा घेणे आणि प्रथम, द्वितीय वर्षांच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याचा कृती आराखडा विद्यापीठाकडून आठ दिवसांत निश्चित केला जाणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑगस्टमध्ये प्रवेश प्रक्रिया आणि सप्टेंबरमध्ये शैक्षणिक सत्र सुरु करण्याची सूचना दिली. त्यावर शिवाजी विद्यापीठाने वेळापत्रक निश्चितीसाठी १८ सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. या समितीची पहिली बैठक गेल्या आठवड्यात झाली आहे. ही समिती शासन आदेशानुसार जुलैमध्ये होणाऱ्या अंतिम वर्षाच्या (सहावे सत्र) परीक्षांचे वेळापत्रक, प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाची पद्धत निश्चित करण्याबाबत अहवाल देणार आहे. या अहवालावर अंतिम निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळाकडून घेण्यात येणार आहे. परिक्षांबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळामध्ये स्वतंत्र कक्ष सुरु केला जाणार आहे.



### एकूण २०० परीक्षा होणार

पूर्वीच्या नियोजनानुसार ६८० परीक्षा घेतल्या जाणार होत्या. मात्र, शासनाने शुक्रवारी घेतलेल्या निर्णयानुसार आता अंतिम वर्षाच्या एकूण २०० परीक्षा होणार आहेत. प्रथम, द्वितीय वर्षासाठी 'एटीकेटी' असणार नाही. या विद्यार्थ्यांसाठी श्रेणी सुधारण्याची संधी आहे.

### अभ्यासक्रमनिहाय परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

| | | |
|---|---|---|
| बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी | : | प्रत्येकी १५,००० |
| एम. ए. | : | १८०० |
| एम. एस्सी | : | २५०० |
| एम. कॉम. | : | ५००० |
| बीबीए | : | १२०० |
| बीसीए | : | १८०० |
| एमसीए | : | २०० |
| एमबीए | : | १००० |
| अभियांत्रिकी | : | ९००० |
| इतर अभ्यासक्रम | : | ६४०० |

"परीक्षांबाबत शासन आदेशानुसार विद्यापीठाकडून कार्यवाही केली जाईल. परीक्षांचे वेळापत्रक आणि शैक्षणिक सत्राच्या निश्चितीसाठी विद्यापीठाने नियुक्त केलेली समिती आठ दिवसांत अहवाल देईल. त्यानंतर कृती आराखडा निश्चित करण्यात येणार आहे.

\- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु